




# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३७३ वा सोमवार दि २५ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# अकोला-वाशिममध्ये अवैध सावकारीवर मोठी धडक कारवाई; १० ठिकाणी छापे, ९ तक्रारींवर एकत्रित मोहीम...

## अवैध सावकारी करणाऱ्यांवर सहकार,पोलीस व महसूल विभागाचा दंडुका...

**जनसंचलन बुलढाणा**

अकोला शहरात अवैध सावकारीच्या वाढत्या तक्रारींना अखेर प्रशासनाने जोरदार प्रत्युत्तर दिले असून सहकार विभाग, महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने एकाचवेळी १० ठिकाणी धडक छापे टाकत मोठी कारवाई केली आहे.या संपूर्ण मोहिमेला मा. जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मिना,मा. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन तसेच अकोला व बुलडाणा अतिरिक्त पदभार असलेले जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गती देण्यात आली. प्राप्त माहितीनुसार,एकूण ९ अर्जदारांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या आधारे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. अकोला व वाशिम जिल्ह्यातील सहकार विभागातील सुमारे ५० अधिकारी-कर्मचारी,पोलीस विभागातील ४०अधिकारी-कर्मचारी तसेच बँक व इतर शासकीय यंत्रणांचा समावेश असलेले सुमारे १०० जणांचे संयुक्त पथक या कारवाईत सहभागी झाले होते. पथक प्रमुखांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या धाडीत सौ. विद्या विवेक गिरी, सौ.रंजना मुंदे, संगिता भारती, मो. जाकीर मो. खलील, श्री भूषण व्याघ्रांबरे, श्री सहदेवराव शिंदे,सौ सपना कडू, सौ शिला नाईक यांच्यासह इतर संबंधित ठिकाणांची झडती घेण्यात आली.या वेळी इसार पावत्या, कोरे चेक,कोरे बॉण्ड, गहाणखत, खरेदी खत,डायऱ्या, करारनामे,सातबारा उतारे व इतर आक्षेपार्ह दस्तऐवज मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आले.या संपूर्ण कारवाईत विशेष मोलाचा वाटा फिरके पथका मध्ये ज्योती मालीये, उप निबंधक सहकारी संस्थाअकोला यांचा समावेश आहे. जप्त कागदपत्रांची सखोल तपासणी सुरू असून,प्राथमिक चौकशीत तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे.





**दरम्यान,अकोला,बुलडाणा व वाशीम येथील सावकारग्रस्त नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी दाखल कराव्यात,तसेच तक्रारदारांची नावे पूर्णपणे गोपनीय ठेवली जातील,असे आवाहन अकोला व बुलडाणा वाशीम जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांनी केले आहे.या कारवाईमुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.**

# चिखलीत लेडी सिंघमची धाड! विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्या अडत्यांवर सहकार विभागाचा मोठा दणका

**जनसंचलन चिखली**

शेतकऱ्यांची लूट करून विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्या धनदांडग्या अडत्यांविरोधात अखेर सहकार प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती एमआयडीसी परिसरात मोठी धाड टाकण्यात आली.जिल्हा उपनिबंधक गीतेशचंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच नियुक्त झालेल्या सहाय्यक निबंधक तथा प्रशासन अधिकारी स्वरूपा धुमाळ यांनी ङ्गङ्घलेडी सिंघममफ स्टाईल कारवाई करत अवैध व्यवहार करणाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहेत. दिनांक १५ मे २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारकर्त्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर सहकार विभागाचे विशेष पथक १८ संशयित व्यापाऱ्यांच्या तपासणीसाठी मैदानात उतरले. यावेळी अनेक व्यापाऱ्यांची दुकाने बंद आढळली तर काही व्यापारी कारवाईच्या भीतीने फरार झाल्याची चर्चा बाजार समिती परिसरात रंगली.नियमबाह्य शेती माल खरेदी करणारे व्यापारी पंकज कोठारी,संदेश जैन,जय अग्रवाल या तीन व्यापाऱ्यांची तपासणी केली असता त्यांनी अर्धवट माहिती दिली असून त्यांच्या विरोधात मोठी प्रशासकीय कारवाई होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. तपासणी दरम्यान काही व्यापाऱ्यांकडे परवाना मुदत संपलेला असतानाही शेतमाल खरेदी सुरू असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आल्याने प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. शेतकऱ्यांच्या मालाची बेकायदेशीर खरेदी करून शासन महसूल व नियमांना हरताळ फासणाऱ्यांवर आता थेट गुन्हे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, सहकार प्रशासनाने स्पष्ट इशारा देत विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्यांची माहिती नागरिकांनी व शेतकऱ्यांनी थेट जिल्हा उपनिबंधक



कार्यालय, बुलढाणा येथे द्यावी,असे आवाहन केले आहे.चिखलीतील या धडक कारवाईमुळे अवैध अडत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून पुढचा नंबर कोणाचा? याचीच चर्चा सध्या बाजार समितीत व चिखली एमआयडीसीत सुरू आहे.

# लेकुरे उदंड कशास व्हावी?

कमी मुले होणाऱ्यांची किंवा मुले न होणाऱ्यांची वाढती संख्या हा सर्व जगासमोरचा प्रश्न आता भारतालाही भेडसावतो आहे. खरे तर असे होण्यात काही अनपेक्षित नाही किंवा ङ्गअरे बाप रे, असे कसे झालेफ असे वाटण्यासारखेही नाही. विकसित देशात हे यापूर्वीच घडलेले आहे; परंतु त्या देशांनी मर्यादित लोकसंख्या आणि मजबूत आर्थिक स्थितीच्या मदतीने यातून बाहेर पडण्यासाठी आपआपला सोयीचा मार्ग शोधला आहे. आता भारताला या प्रश्नाला तोंड द्यायचे आहे. लोकसंख्येत सतत बदल होत असतात. जन्म, मृत्यू आणि स्थलांतर अविरत सुरू असते. लोकसंख्या वाढीचा दर कमी अधिक प्रमाणात बदलत असतो. लोकसंख्येचा आकडा जसजसा बदलू लागतो तसतसा तो बदल लोकसंख्येच्या सर्व गट आणि उपगटांतही दिसू लागतो. लोकसंख्येत होणारे बदल जसे सामाजिक आणि आर्थिक बाबींवर अवलंबून असतात, तसेच त्या बदलांचा परिणामही सामजिक आणि आर्थिक स्थितीवर होत असतो. जेव्हा विकास होतो, समाज बदलतो तेव्हा तेथील जन्म-मृत्यूच्या चक्रावर त्या बदलाचे चित्र उमटते. लोकसांख्यिकीय संक्रमणात कुठलाही देश अधिक जन्मदर आणि अधिक मृत्यूदर या स्थितीपासून सुरुवात करून नंतर कमी जन्मदर आणि कमी मृत्यूदराकडे वाटचाल करतो. म्हणजे सुरुवातीला जन्मदर आणि मृत्यूदर दोन्ही जास्त असतात, पण काळाच्या ओघात बदलत ते कमी जन्मदर आणि कमी मृत्यूदर या स्थितीला येऊन पोचतात. ही लोकसांख्यिकीय संक्रमणाची प्रक्रिया अतिशय नैसर्गिकपणे होत असल्याने ती थांबवता येत नाही. लोकसांख्यिकीय संक्रमणाचा, बदलांचा परिणाम आता भारततही दिसू लागला आहे. ही प्रक्रिया विकासाशी जोडली असल्याने यात जन्मदर आणि मृत्यूदर बरोबरीने घटणे अपेक्षित असते; परंतु भारतासारख्या किंवा एकूणच विकसनशील देशात मात्र हा बदल घडून येत असताना आधी मृत्यूदर झपाट्याने घटला आणि जन्मदरातील घट मात्र सावकाश झाली. परिणामतः त्या काळात लोकसंख्या वेगाने वाढली. ही वाढ रोखण्यासाठी - जन्मदर खाली आणण्यासाठी जोरदार प्रयत्न करावे लागले. त्यासाठी भारताने कुटुंबनियोजन कार्यक्रमाबरोबरच माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी तसेच जीवितासाठी अनेक कार्यक्रम राबविले. हळूहळू लोकसंख्या वाढ नियंत्रणात आली आणि भारताचा एकूण जननदर खाली आला. जननक्षम वयातील स्त्रियांना होणाऱ्या मुलांची सरासरी संख्या, म्हणजेच एकूण जननदर २.१ झाल्यावर तो देश ङ्गरीप्लेसमेंट लेव्हल फर्टिलिटीफ्ला पोचला असे म्हणतात. २.१ ही संख्या, लोकसंख्या स्थिर होण्याचा निर्देशक आहे. सध्या भारताचा एकूण जननदर २ आहे. भारतीय समाजाची स्थिर लोकसंख्येकडे वाटचाल सुरू आहे. भारतात विविधता आहे. अनेक दृष्टींनी भारतातील राज्ये निराळी आहेत. विविध राज्यांची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती निराळी आहे. तेथे राहणाऱ्या विविध धर्मीय, पंथीय, जाती-जमातीचे जीवनमान निराळे आहे. या विविधतेचा, विविध प्रकारच्या वैशिष्ट्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर होत असतो. त्यांच्या जीवनपद्धतीतील फरक जन्म - मृत्यूविषयी सर्वच निर्देशकांवर स्पष्टपणे दिसून येतो. याखेरीज, लोकसंख्येच्या विविध निर्देशांकांचे बारकाईने अवलोकन केल्यास उत्तर भारत आणि दक्षिण भारत हे दोन भाग पूर्णपणे भिन्न असल्याचे निःसंदिग्धपणे दिसते. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये लोकसंख्येचे कार्यक्रम अतिशय नेटकेपणाने राबविले गेले. तुलनेने शिक्षितांचे प्रमाणही अधिक असल्याने हे सोपे झाले. माता आणि बालकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरवल्यामुळे जननदर नियंत्रित झाला. संपूर्ण देश ङ्गरीप्लेसमेंट लेव्हल फर्टिलिटीफ्च्या स्थितीला पोचण्याच्या कितीतरी आधीच दक्षिणेतील राज्ये तेथे पोचली होती. दक्षिणेकडील राज्यांतील समाजाने राज्यकर्त्यांच्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला. त्यात केरळ आणि तमिळनाडू ही राज्ये अग्रेसर होती. लोकसंख्या वाढीचा दर कमी झाल्याने त्या राज्यात होणारी वाढ पूर्णपणे नियंत्रित होती. लोकसंख्येचा आकडा सर्वच राज्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे; कारण विकास, आरोग्य याखेरीज इतर अनेक सामाजिक कारणांच्या बरोबरीनेच दोन राजकीय कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत.

देशाच्या राजकारणात राज्याचे प्रतिनिधित्व आणि (२) राज्यांना केंद्र सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत. केंद्र सरकार चालविण्यासाठी लोकसभेतील प्रत्येक राज्याच्या जागा त्या त्या राज्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ठरविलेल्या आहेत. सध्याची ५४३ ही संख्या १९७६ साली निश्चित केली; तेव्हा १९७१च्या लोकसंख्येचे आकडे प्रमाण मानले होते. त्यानंतरच्या ५० वर्षांच्या काळात भारतीय समाज खूप बदलला. लोकसंख्या ५५ कोटींवरून १४५ कोटींवर पोचली. इतक्या काळानंतर प्रतिनिधित्वाच्या संख्येत बदल अपेक्षित आहेत. यासाठी जर लोकसंख्या प्रमाणाचा निकष लावला तर मग दक्षिणेतील राज्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामानंतरही त्यांना फायदा तर सोडाच पण कमी जागा मिळण्याने एक प्रकारे तोटाच होईल. याबरोबरच केंद्र सरकारकडून राज्यांना मिळणारा निधी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मिळाला तर तो कमी होईल, ही भीतीही आहेच. या राजकीय फायद्यातोट्यांपेक्षाही आणखी एक लोकसांख्यिकीय बाब आहे. जननदर घटल्यामुळे समाजातील मुलांचे प्रमाण कमी होत जाते. हे प्रमाण मुळातच कमी झाल्याने नंतर कामकाजी वयोगटात जाणाऱ्यांचे प्रमाणही कमी होते. म्हणजेच आर्थिक जबाबदारी घेणाऱ्यांचेच प्रमाण कमी होते. अशी परिस्थिती सुखावह नसली तरीही एकदा सुरू झालेली ही प्रक्रिया उलट दिशेने जाणे फार अवघड आहे. दिवसेंदिवस सरासरी आयुर्मान वाढते आहे. त्यामुळे समाजातील ज्येष्ठांची संख्या आणि पर्यायाने प्रमाण वाढते आहे. वाढत जाणाऱ्या ज्येष्ठांची काळजी घेण्यास लागणारे मनुष्यबळ तुलनेने कमी होत आहे. भारतात ज्येष्ठांसाठी कोणतीही आर्थिक सुरक्षितता उपलब्ध नाही. त्यांची जबाबदारी घेण्यास जर नंतरची पिढी पुरेशी सक्षम नसेल तर एक मोठा प्रश्न उभा राहू शकतो. या परिस्थितीला, सर्व अडचणींना, देशाला काही काळानंतर आणि दक्षिणेतील राज्यांना लवकरच तोंड द्यावे लागणार आहे.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## शिर्डीतील कार्यक्रमासाठी दोघांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला दिलेला प्रतिसाद

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रेल्वेने तर उद्योग मंत्री उदय सामंत यांचा विमान प्रवास!

**राहाता/वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, शनिवारी रेल्वे प्रवास करत मुंबईहून शिर्डी गाठली तर शिवसेनेचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी चार्टर विमानाने मुंबई ते शिर्डी असा प्रवास केला. मुख्यमंत्री फडणवीस व मंत्री सामंत शिर्डीतील एकाच कार्यक्रमास आज उपस्थित होते. मात्र दोघांच्या या प्रवासाकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत आवाहनाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात आहे. एकाने दिलेला प्रतिसाद आणि दुसऱ्याने केलेले दुर्लक्ष.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डीजवळील सावळी विहीर येथे 'ग्लोब फोर्ज' या खासगी कंपनीच्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन आज सायंकाळी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, संरक्षणदल प्रमुख जनरल अनिल चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणार होते. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस रेल्वे प्रवासाने तर उद्योग मंत्री सामंत विमानाने शिर्डीत दाखल झाले.

पंतप्रधान मोदी यांनी आणि राज्य सरकारनेही इंधन बचतीचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमान प्रवास टाळून भल्या सकाळीच मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस गाठत ६.२० वा. मुंबई ते शिर्डी असा प्रवास वंदे भारत रेल्वेने करुन, सकाळी ११.३० वा. शिर्डी येथिल साईनगर रेल्वे स्थानकावर त्यांचे आगमन झाले. त्यांच्या ताफ्यात पाच वाहने होती.

एरवी विमानतळ अथवा हेलिपॅडवर मुख्यमंत्र्यांचे आगमन होताच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह इतरांची स्वागतासाठी मोठी गर्दी असते परंतु फडणवीस यांच्या स्वागतासाठी शिर्डी रेल्वे स्थानकावरून कुणी येऊ नये असा फतवा मुख्यमंत्री कार्यालयाने काढला होता. त्यानुसार फडणवीस यांचे रेल्वे



स्थानकावर केवळ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीच स्वागत केले. जलसंपदा तथा पालकमंत्री विखे यांनीही आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करून पंतप्रधानांच्या आव्हानाचे प्रतिसाद दिला.

उद्योग मंत्री सामंत हे शिर्डी येथील कार्यक्रमास मुंबई येथुन चार्टर विमानाने आले व नियोजित कार्यक्रमानुसार ते त्याच विमानाने पुणे येथील कार्यक्रमास रवाना होणार होते तर फडणवीस हे समृद्धी महामार्गावरून मोटारीने नागपूरकडे रवाना होणार होते. मुख्यमंत्री व त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्र्याचा प्रवास विसंवाद या निमित्ताने पुढे आल्याने राजकीय वर्तुळाच चर्चा रंगली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत व राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेचा हवाला देत शासकीय पातळीवर काटकसर करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनानंतर राज्य सरकारनेही प्रशासनाला खर्च कपातीचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कृतीतून दिलेला संदेश आणि उद्योग मंत्री सामंत यांनी दुर्लक्षातून दिलेला संदेश याकडे दोघांच्या प्रवासाकडे पाहिले जाते आहे.

शिर्डीतील साईनगर रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, वंदे भारत रेल्वे ही नव्या भारताची एक अनुपम भेट पंतप्रधान मोदींनी दिली आहे. आज मी या रेल्वेने शिर्डीला आलो, खूप चांगला अनुभव घेता आला, लोकांच्या भेटी झाल्या, रस्त्यात फाईलचे काम करता आले. मला आजचा प्रवास अत्यंत लाभदायी वाटला. जेवढे अनुकरण करता येईल तेवढे प्रत्येकाने करावे, आपण केले तर लोकांना करण्याची इच्छा होते.

## अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची

**परभणी/वृत्तसंस्था**

कॉक्रोच जनता पार्टी या अनोख्या आणि देशातील सर्वात मोठ्या डिजिटल राजकीय चळवळीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना थेट जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतः अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर "Receiving death threats now" (आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत) असे लिहीत या संदर्भातील माहिती शेअर केली आहे.

अभिजीत दिपके यांनी त्यांच्या पोस्टमध्ये "Receiving death threats now" (आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत) असे लिहीत त्यांना आलेल्या धमकीचा स्क्रीनशॉट किंवा माहिती शेअर केली आहे. गेल्या काही दिवसांत त्यांनी मांडलेल्या काही भूमिका किंवा पोस्टमुळे त्यांना लक्ष्य केले जात असल्याचे प्राथमिक दृष्ट्या समोर येत आहे. या घटनेनंतर सोशल मीडियावरील त्यांच्या पाठीराख्यांनी आणि नेटिझन्सनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वैचारिक मतभेदांमधून थेट जीवे मारण्याची धमकी देणे अत्यंत चिंताजनक असल्याचे युझर्सचे म्हणणे आहे. अनेक पत्रकारांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित धमकी देणाऱ्या व्यक्तीविरोधात तातडीने सायबर पोलिसांत गुन्हा दाखल करावा आणि अभिजीत दिपके यांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी नेटकऱ्यांकडून होत आहे. पोलीस या प्रकरणावर काय पाऊल उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. ही चळवळ सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत तब्बल २० लाखांहून अधिक लोकांनी यात सहभाग नोंदवला आहे. "काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात", असे खळबळजनक वक्तव्य सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका सुनावणीदरम्यान केले होते. सरन्यायाधीशांच्या या वक्तव्यानंतर देशभरातून तीव्र पडसाद उमटले आणि याच वादातून 'कॉक्रोच जनता पार्टी' या डिजिटल राजकीय चळवळीचा जन्म झाला.

## राज्यातही मतदारयाद्यांमध्ये घोळ करण्याचा प्रयत्न; फेरतपासणी मोहिमेवर काँग्रेसचा आरोप

**परभणी/वृत्तसंस्था**

मुंबई: भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदानचोरी करून महाराष्ट्रात सत्ता मिळवली. बिहार आणि बंगालमध्येही मतदारांची नावे वगळून भाजपने विजय मिळवला. मतदार यादी फेरतपासणीच्या माध्यमातून राज्यातही निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा व नावे वगळण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरपोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.



निवडणूक आयोगामार्फत राज्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार यादी फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीची ज्यस्तरीय बैठक संपन्न झाली. बैठकीला माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्यकारी समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात व नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गुरुदीप सप्पल, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर यांच्यासह प्रमुख नेते खासदार, आमदार व बुथ स्तरीय कार्यकर्ते उपस्थित होते. मतदार यादीतील कथित गैरप्रकार, मतदानचोरी आणि एसआयआर संदर्भात या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. बैठकीच्या सुरुवातीला केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मिळवलेल्या विजयाबद्दल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अभिनंदनाचा तसेच केरळचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गृहमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल व सर्व नवनियुक्त जिल्हाध्यक्षांचे अभिनंदन करणारा ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने एसआयआर मोहिमेबाबत सुरु केलेल्या मोहिमेच्या लोगोचे सर्व प्रमुख्य नेत्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. आगामी काळात राज्यभर जनजागृती मोहीम राबवून मतदारांचे अधिकार अबाधित राखण्यासाठी काँग्रेस पक्ष आक्रमकपणे मैदानात उतरणार असल्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीविषयीच माहिती सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रत्येक मतदाराचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने एसआयआर मोहिमेसाठी विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांची या समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## आम्हीही घरी जाऊन मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला होता : बच्चू कडू

**हेग/वृत्तसंस्था**

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बच्चू कडू यांच्यावर जोरदार टीका केली होती. बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती राजकीय पक्ष शिंदेंच्या शिवसेनेत विलीन करत धुनष्यबाण हाती घेतला. या पार्श्वभूमीवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं की, "आपल्यातून जो गेला तो देखील जुना शिवसैनिकच होता. घरी बोलावून मंत्री केलं ही माझी चूक होती."

उद्धव ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर आता बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं आहे. 'आम्ही देखील त्यांच्या घरी जाऊन उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला होता. उद्धव ठाकरेंनी मला तेव्हा कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता, पण देताना राज्यमंत्रिपद दिलं', असा गौप्यस्फोट बच्चू कडू यांनी केला आहे. "उद्धव ठाकरे यांच्याकडून अशा वक्तव्याची मला अपेक्षा नव्हती. मला त्यांना



एक प्रश्न विचारायचा आहे, तुम्ही आधी मुख्यमंत्री झाले की मी आधी राज्यमंत्री झालो? उद्धव ठाकरे यांनी माझ्या या प्रश्नावर विचार करावा. मला त्यांच्याकडून या उत्तराची अपेक्षा आहे. मला सांगा जेव्हा हे (महाविकास आघाडी) सरकार सत्तेत येण्याच्या हालचाली सुरू होत्या, तेव्हा मुख्यमंत्री नेमकं कोणत्या पक्षाचा होणार? याबाबत सगळीकडे संभ्रम होता. तेव्हा माझ्या पक्षाचे दोन आमदार होते. उलट तेव्हा शिवसेना (ठाकरे) माझ्या विरोधात लढली होती, एवढंच नाही तर माझ्या विरोधात उद्धव ठाकरेंनी सभा देखील घेतली होती", असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. "जेव्हा महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत येण्याच्या हालचाली सुरू झाल्या, तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजपा या सगळ्या पक्षांकडून मला ऑफर होत्या. मात्र, तेव्हा एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची आणि माझी भेट घालून दिली. त्यानंतर मलाही वाटलं की आपण उद्धव ठाकरे यांना पाठिंबा दिला पाहिजे. मग तेव्हा आम्ही देखील त्यांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे यांना पाठिंबा होता", असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. "उद्धव ठाकरे यांनी तेव्हा मला एकट्या अपक्षाला मंत्री केलं नव्हतं. तेव्हा मला तर ते कॅबिनेट मंत्रिपद देणार होते, पण देताना राज्यमंत्री पद दिलं. शंकरराव गडाख यांना माझ्याऐवजी कॅबिनेट मंत्री केलं. पण उद्धव ठाकरे यांनी आम्हाला मंत्री का केलं? याचं कारणही त्यांना विचारलं पाहिजे. उद्धव ठाकरे यांनी मला कॅबिनेट मंत्री पदाचा शब्द दिला होता. पण नंतर सांगितलं की कॅबिनेट मंत्री पद शक्य होणार नाही. मात्र, या कॅबिनेट मंत्रिपदाच्या अटीवरच त्यांना पाठिंबा दिला होता", असा गौप्यस्फोट बच्चू कडू यांनी केला.

"उद्धव ठाकरे यांनी मला तेव्हा सांगितलं होतं की आपलं म्हणजे शिवसेनेचं संख्याबळ अधिक दिसलं पाहिजे. त्यामुळे आम्हाला मुख्यमंत्री पदावर दावा करता येईल. मात्र, आता त्यांनी ज्या प्रकारचं वक्तव्य केलं, त्यावर त्यांना असं म्हणायचं आहे का? की आमची मदत त्यांना झाली नाही. आम्ही उद्धव ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांना मुख्यमंत्री पदासाठी पाठिंबा दिला हे ते विसरत आहेत", असंही बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. "आपल्यातून जो गेला तो जुना शिवसैनिकच होता. घरी बोलवून मंत्री केलं ही माझी चूक झाली. लोभापायी जे गेले त्यांना जाऊ द्या, लढणारे कार्यकर्ते माझ्याबरोबर आहेत, याचा मला आनंद आहे", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं. प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधणे यांनी मातोश्री येथे त्यांच्या सहकाऱ्यांसह शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी बच्चू कडू यांच्यावर टीका केली होती.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भररस्त्यात 7-8 जणांचा गोळीबार, सख्ख्या भावांचा जागीच गेम; जामिनावरील टोळीचा कारनामा

**ठाणे/वृत्तसंस्था**

उल्हासनगरमधील कॅम्प-५ परिसरात गुरुवारी सायंकाळी भररस्त्यात झालेल्या गोळीबाराने शहर हादरले आहे. कैलाश कॉलनी चौकात झालेल्या या थरारक हल्ल्यात दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा काका गंभीर जखमी झाला आहे. जुन्या वैमनस्यातून हा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.या हल्ल्यात अनिल हरकेश चौहान (२२) आणि अमन हरकेश चौहान (१७) यांचा मृत्यू झाला. तर अर्जुन सुरजबली चौहान (२६) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरुवातीला त्यांना मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.सायंकाळी साडेसातच्या सुमारास कैलाश कॉलनी चौकात अचानक ७ ते ८ जणांचा गट आला आणि त्यांनी गर्दीसमोरच गोळीबार सुरू केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. काही क्षणांतच



परिसरात एकच गोंधळ उडाला. जीव वाचवण्यासाठी नागरिकांनी धावाधाव केली. हल्लेखोरांनी उघडपणे रस्त्यावर अनेक गोळ्या झाडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले.प्राथमिक तपासात ही घटना २०२० पासून सुरू असलेल्या जुन्या वैमनस्यातून घडल्याची माहिती समोर आली आहे. अंबरनाथ गावाशी संबंधित एका कुख्यात गुंडा आणि कैलाश कॉलनी परिसरातील काही रहिवाशांमधील वादातून हा गोळीबार झाल्याचा पोलिसांचा संशय आहे.दरम्यान, या प्रकरणातील सहा ते सात आरोपींची ओळख पटल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींपैकी काही जण यापूर्वीही हत्येच्या गुन्ह्यात आरोपी होते आणि सध्या जामिनावर बाहेर होते.घटनेची माहिती मिळताच हिललाइन पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि गुन्हे शाखेची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. परिसराची नाकाबंदी करून तपास सुरू करण्यात आला असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

“२०२० च्या पूर्ववैमनस्यातून हा हल्ला झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सहा ते सात आरोपींची ओळख पटली असून त्यांचा शोध सुरू आहे. लवकरच सर्व आरोपींना अटक करण्यात येईल,” अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## विवाहित महिलेचा सातवेळा गर्भपात; नाशिकमधील ३३ वर्षीय तरुणीचा छळ

**नाशिक/वृत्तसंस्था**

पतीसह सासू-सासऱ्यांनी सातवेळा सक्तीने गर्भपात घडवून आणल्याचा आणि विवाहबाह्य संबंधांतून विवाहित महिलेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचा प्रकार उघड झाला. म्हसरूळ पोलिसांत संशयित पती, सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.३३ वर्षीय पीडितेच्या फिर्यादीनुसार, २०११मध्ये पंचवटीतील विवाह मंडळात तिचा आंतरजातीय प्रेमविवाह झाला होता. कौटुंबिक विरोध असल्याने हे दाम्पत्य परजिल्ह्यात वास्तव्यास होते. पीडिता पहिल्यांदा गर्भवती असताना नाशिकमध्ये माहेरी मुक्कामी होती. त्यावेळी पती विक्रम (नाव बदलले) व सासू-सासऱ्यांनी तिला मानसिक त्रास दिला. डिसेंबर २०१५ मध्ये दोन्ही कुटुंबांत सामंजस्याने एकत्रित राहण्याचा निर्णय झाला. त्यानंतर पीडितेने एक मुलगा व मुलीला जन्म दिला. संशयितांनी तिला नाशिकमध्ये बोलावून घेतले. तिला मारहाण व मुलांना जिवे मारण्याची धमकी दिली. मखमलाबाद येथे घर घेण्यासाठी पीडितेचे सर्व पैसे, दागिने घेऊन विम्यावर कर्ज काढले. २०२४ मध्ये संशयिताचे विवाहबाह्य संबंध असल्याचे निदर्शनास आले.दरम्यान, पीडितेला पतीसमवेत राहू न देता सासू-सासऱ्यांसोबत राहण्याची सक्तीही करण्यात आली होती. अखेर या सर्व प्रकाराला कंटाळून पीडितेने पोलिसांत धाव घेतली.नाशिकमध्ये आणखी एक धक्कादायक घटना उघड झाली आहे. विवाहित महिला दोन महिन्यांची गर्भवती असताना तिच्या पोटावर लाथा मारून तिचा गर्भपात करण्यासह तिच्या पतीने ‘हलाला’ विधीच्या नावाखाली मित्रांना घरात बोलावून पीडितेचा विनयभंग केल्याचा प्रकार उघड झाला. आयेशानगर येथील २२ वर्षीय विवाहितेच्या फिर्यादीवरून मुंबई नाका पोलिसांत संशयित पती अशरफ मलिक, इम्रान चौधरी, आसिक शेख व समीर खान यांच्यावर गुन्हा नोंद आहे. पीडित महिलेचे लग्न संशयित अशरफ मलिक याच्याशी झाले होते. संशयिताने त्याचे पहिले लग्न झाल्याची बाब लपवून ठेवली. काही दिवसांतच पीडितेचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. संशयिताने दोन वेळा पीडितेला जिवे मारण्याचाही प्रयत्न केला.

## भिक्षेच्या जोखडातून 65 जणांची सुटका; चिमुकल्यांचा होत होता वापर, नागपूर हादरलं

**नागपूर/वृत्तसंस्था**

उन्हाचा पारा ४२ ते ४४च्यावर असतानाही भर उन्हात शहरात चिमुकल्यांना कडेवर घेऊन भिक्षा मागणाऱ्यांवर मंगळवारी मोठी कारवाई करण्यात आली. पोलिस विभाग, महिला व बालविकास विभागाच्या बालसंरक्षण विभागाची चमू आणि सामाजिक कार्यकर्यांच्या संयुक्त विद्यमाने या चिमुकल्यांसह ६५ जणांची भिक्षेच्या जोखडातून सुटका करण्यात आली.भर उन्हात बालकांच्या मदतीने भिक्षा मागितली जात असल्याचे चित्र शहराच्या चौकाचौकांत बघावयास मिळत होते. लहान मुलांना गुंगीचे औषध देऊन त्यांचा भिक्षेसाठी वापर होत असल्याचेही वेळोवेळी उघडकीस आले. यात या चिमुकल्यांचा जीव धोक्यात टाकला जातो. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या या चिमुकल्यांची सुटका व्हावी आणि त्यांना चांगले आरोग्य आणि शिक्षण मिळावे, याबाबतचे वृत्त ‘मटा’ने वेळोवेळी प्रकाशित केले. प्रशासनाकडून कारवाई होत होती; मात्र, पुन्हा तेच चित्र बघावयास मिळत होते. मंगळवारी पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन मुक्ती अंतर्गत हे अभियान राबविण्यात आले.



शहरातील मोक्याच्या ठिकाणी, जिथे भिक्षावृत्तीचे प्रमाण अधिक आहे, अशा भागांमध्ये संयुक्त पथकाने धडक कारवाई केली. कारवाई करण्यासाठी गेलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांचा भिक्षेकऱ्यांनी चावा घेण्याचा प्रयत्न केला. शिव्या दिल्या जात होत्या. मारहाणीचे प्रयत्नही झाले. त्यामुळे काहीसा तणाव निर्माण झाला होता. मेयो हॉस्पिटल, मोमीनपुरा, गोळीबार चौक, महाल, गांधीबाग, संत्रा मार्केट, सीताबर्डी आणि रेल्वेस्टेशन परिसरात ही कारवाई करण्यात आली. सुटका केलेल्यांना वसतिगृह, बेघर निवारा केंद्र, बालगृह येथे ठेवण्यात आले आहे.या व्यक्तींच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाने दिली. ही मोहीम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, पाचपावलीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाबुराव राऊत आणि तहसील पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांच्यासह या मोहिमेत चाइल्ड हेल्पलाइनचे प्रतिनिधी अनिकेत भिवगडे, मीनाक्षी धडाडे, पूजा कांबळे, सचिन धोतरकर व रणजीत कुंभारे यांच्यासह सह्याद्री फाउंडेशन, दिव्य वंदना फाउंडेशन, न्यू व्हिजन फाउंडेशन व ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट यांचा सहभाग होता.

## नीट पेपरफुटी प्रकरणात खुलासे होणार; लातूरमध्ये दोन डॉक्टरांची चौकशी

**लातूर/वृत्तसंस्था**

'नीट' पेपरफुटीप्रकरणी शुक्रवारी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने लातूरमध्ये आणखी दोन डॉक्टरांची चौकशी केली. पथकाने आतापर्यंत तीन डॉक्टरांची चौकशी केल्यामुळे लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. गेल्या रविवारी सीबीआयचे पथक लातूरमध्ये आले आहे. पेपरफुटीप्रकरणी त्यांची चौकशी सुरू आहे. गेल्या सात दिवसांपासून पथक ठाण मांडून आहे. पथकाकडून पेपरफुटी प्रकरणातील संशयितांची सखोल तपासणी आणि चौकशी केली जात आहे.पथकाने शुक्रवारी सकाळी जुना औसा मार्गावरील दत्त मंदिराजवळील एका बीएएमएस डॉक्टरच्या दवाखान्यात जाऊन तपासणी केली. पथकाने काही कागदपत्रे



ताब्यात घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. बार्शी रस्त्यावरील दयानंद कॉलेजच्या परिसरातील बालरोगतज्ज्ञ डॉक्टरच्या दवाखान्याचीही शुक्रवारी तपासणी झाली. त्यानंतर या दोघांचीही सायंकाळी औसा रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहात चौकशी सुरू होती. या दोन डॉक्टरांचा पेपरफुटीशी कसा संबंध आला? ते कोणाच्या संपर्कातील आहेत? याबद्दल जोरदार चर्चा सुरू असून, दोषी पालकांचीही चौकशी केली जाणार असल्याची चर्चा आहे. लातूर सहकारी औद्योगिक वसाहतीत सुरु असलेले क्लास, वसतिगृहे, खानावळी, अभ्यासिका त्याचप्रमाणे अन्य व्यवसाय तातडीने बंद करण्याचा आदेश लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिला.वसाहतीत उत्पादनाव्यतिरिक्त सुरु असलेले व्यवसाय बंद करावेत, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता मल्लिकार्जुन भाईकट्टी यांनी केली होती. दरम्यान, या आदेशामुळे नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या कोठडीत असलेला आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर आणि कुटुबीयांना दणका बसला आहे. वसाहतीत मोटेगावकर कुटुंबीयांशी संबंधित असलेल्या भूखंड आणि इमारत वापराबाबत भाईकट्टी अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत होते. जिल्हाधिकाऱ्यांची शुक्रवारी बैठक झाली. त्यानंतर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी संबंधित संस्थेच्या अक्ष्यक्षांना जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कळविला.नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने आणखी मोठी कारवाई केली आहे. सीबीआयने या प्रकरणी आणखी एका प्राध्यापिकेला अटक केल्याची माहिती समोर येत आहे. मनीषा हवलदार असं या महिलेचे नाव आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात पुण्यातून मनीषा नावाने अटक होणारी ही तिसरी महिला आहे. मनीषा हवलदार या फिजिक्सच्या प्राध्यापिका आहेत, अशी माहिती आहे. एनटीएकडे असणाऱ्या फिजिक्सच्या प्रश्नांना मनीषा हवालदार हिला ॲक्सेस होता. तसेच यापूर्वी अटक झालेल्या मनीषा मांढरेला मिळून मनीषा हवालदारने फिजिक्सचे प्रश्न लीक केल्याचा आरोप आहे.


# तेलही गेलं आणि तूपही गेलं! गुजरातकडून हरल्यानंतर ऋतुराजसह संपूर्ण CSK संघावर दंडात्मक कारवाई

■ मुंबई, वृत्तसंस्था :

चेन्नई सुपर किंग्सला यंदाच्या हंगामातील अखेरच्या सामन्यात गुजरात टायटन्सकडून लाजिरवाण्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. यासह चेन्नईचा संघ स्पर्धेतून बाहेर झाला आहे. ८९ धावांनी स्वीकारलेला हा पराभव चेन्नईसाठी आयपीएलच्या इतिहासातील धावांच्या तुलनेत मोठा पराभव आहे. या पराभवातून संघ सावरलेला नसताना आता बीसीसीआयने कर्णधार ऋतुराज गायकवाडसह संपूर्ण संघावर दंडात्मक कारवाई केली आहे. कारण काय आहे जाणून घेऊया.

गुजरातविरुद्धच्या सामन्यानंतर बीसीसीआयने कर्णधारासह संपूर्ण चेन्नई सुपर किंग्स संघाला दंड ठोठावला आहे. सामन्यात षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आलं आणि मोठा दंड ठोठावण्यात आला. या हंगामात चेन्नई सुपर किंग्सने हा गुन्हा करण्याची ही दुसरी वेळ आहे, ज्यामुळे संपूर्ण संघाला मोठा दंड ठोठावण्यात आला आहे.

या आयपीएल हंगामात चेन्नई संघाला स्लो ओव्हर रेटचा दुसऱ्यांदा फटका बसला. यापूर्वी, हंगामातील १८ व्या





सामन्यात, संघ निर्धारित वेळेत आवश्यक षटकं टाकण्यात अपयशी ठरला होता. आचारसंहितेच्या नियम २.२२ नुसार, जो षटकांच्या गतीशी संबंधित आहे, कर्णधार ऋतुराज गायकवाडला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. केवळ कर्णधारावरच नव्हे, तर संघातील इतर सर्व खेळाडूंवर कारवाई करण्यात आली आहे. त्या सर्वांना ६० लाख रुपये किंवा त्यांच्या सामना शुल्काच्या २५% दंड ठोठावण्यात आला आहे. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्स आयपीएल २०२६ मध्ये सपशेल अपयशी ठरली. या हंगामात खेळलेल्या १४ सामन्यांपैकी संघाला केवळ सहा सामने जिंकता आले. १२ गुण आणि -०.३४५ च्या खराब नेट रन रेटमुळे सीएसकेला यावेळी प्लेऑफमध्ये स्थान गाठता आलं नाही. सलग तिसऱ्या हंगामात चेन्नईला आयपीएल प्लेऑफमध्ये स्थान मिळवता आलेलं नाही. चेन्नईने शेवटचे आयपीएल विजेतेपद २०२३ मध्ये एम.एस. धोनीच्या नेतृत्वाखाली जिंकले होते.

चेन्नई सुपर किंग्सने नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. गुजरातच्या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी पहिल्या विकेटसाठी १२५ धावांची भागीदारी केली. तर दुसऱ्या विकेटसाठी साई सुदर्शन व जोस बटलर यांनी ८२ धावा केल्या. यासह टॉप-३ फलंदाजांनी अर्धशतकी खेळी करत संघाला २२९ धावांचा मोठा डोंगर उभारून दिला.

प्रत्युत्तरात, चेन्नई सुपर किंग्सचा संपूर्ण संघ १३.४ षटकांत फक्त १४० धावा करत सर्वबाद झाला. या हंगामात चेन्नईला अनुभवी खेळाडू एम.एस. धोनीची सर्वाधिक उणीव भासली. दुखापतीमुळे तो या हंगामात एकही सामना खेळू शकला नाही.

## १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीनंतर बड्या उद्योगपतीची पोस्ट चर्चेत

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल स्पर्धेत सध्या युवा खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. ज्यात १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीचं नाव सर्वात आघाडीवर आहे. राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळताना वैभव सूर्यवंशीने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये बिहार संघाचं प्रतिनिधित्व करतो. आता आयपीएल स्पर्धेतही तो बिहारकडून खेळताना दिसून येऊ शकतो. वेदांता ग्रूपचे चेअरपर्सन अनिल अग्रवाल यांनी आयपीएलमध्ये संघ खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे बिहारच्या खेळाडूंना आयपीएलमध्ये आणखी संधी निर्माण होऊ शकते.

अनिल अग्रवाल हे प्रसिद्ध उद्योगपती असून ते मूळचे बिहारचे आहेत. त्यांचा जन्म १९५४ मध्ये बिहारमधील पटना येथे झाला. त्यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरून पोस्ट करून बिहारचा संघ खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, "बिहारने देशाला अनेक उत्कृष्ट खेळाडू दिले आहेत. त्यामुळे बिहारचा देखील एक संघ असायला हवा." आयपीएल स्पर्धेत काही असे संघ आहेत, जे पहिल्या हंगामापासून या संघाचा भाग आहेत. त्यानंतर काही संघ आले आणि निघून गेले. ४ वर्षांपूर्वी आयपीएलमध्ये २ नवीन संघांचा समावेश करण्यात आला होता. गुजरात टायटन्स आणि लखनौ सुपर जायंट्स संघाने लिलावात मोठी बोली आणि संघ खरेदी केला. अनिल अग्रवाल यांनी लिहिले की, "चेन्नई सुपर किंग्स, मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स हे आयपीएल स्पर्धेतील उत्कृष्ट संघ आहेत, तुम्हाला नाही वाटत बिहारचा देखील एक संघ असायला हवा? बिहारने देशाला अनेक उत्कृष्ट खेळाडू दिले आहेत. पटनामध्ये जन्मलेल्या इशान किशनने सर्वात जलद दुहेरी शतक झळकावलं होतं. समस्तीपूरचा वैभव सूर्यवंशी आयपीएल स्पर्धेत पदार्पण करणारा सर्वात युवा खेळाडू ठरला.

## हैदराबादचा RCB वर विजय, पण बंगळुरुत जल्लोष

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ६७ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना गुणतालिकेतील टॉप ३ मध्ये असलेल्या संघांमध्ये पार पडला. टॉप २ मध्ये कोणता संघ प्रवेश करणार? हे याच सामन्याच्या निकालावरून समजणार होतं. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हैदराबादने ४ गडी बाद २५५ धावांचा भलामोठा डोंगर उभारला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला अव्वल स्थानी कायम राहण्यासाठी १६६ धावांचा पल्ला गाठायचा होता. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने हा सामना गमावला, पण २०० धावा करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ अव्वल स्थानी पोहोचला आहे. तर सनरायझर्स हैदराबादचा संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी आहे. हैदराबादने हा सामना ५५ धावांनी आपल्या नावावर केला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाला हा सामना जिंकण्यासाठी २५६ धावांचा डोंगर सर करायचा होता. तर गुणतालिकेत अव्वल स्थानी राहण्यासाठी आणि नेट रनरेटसाठी १६६ धावा करायच्या होत्या. या सामन्यात विराट कोहली आणि वेंकटेश अय्यरची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. अय्यरने अवघ्या १९ चेंडूत ४४ धावांची वादळी खेळी करुन दमदार सुरुवात करुन दिली. तर विराट कोहली अवघ्या १५ धावांवर माघारी परतला. तर देवदत्त पडिक्कलने २१





धावांचे योगदान दिले. शेवटी रजत पाटीदार आणि कृणाल पंड्या यांनी मिळून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाचा डाव सांभाळला. १६६ धावांचा पल्ला गाठताच रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाने गुणतालिकेतील नंबर १ स्थानावर शिक्कामोर्तब केलं. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हैदराबादने २० षटकांअखेर ४ गडी बाद २५५ धावा केल्या. सलामीला आलेल्या अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडने पहिल्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी केली. हेडने २६ धावांची खेळी केली. तर अभिषेक शर्माने ५६ धावा चोपल्या. तर इशान किशनने शेवटी ७९ धावांची वादळी खेळी केली. हेनरिक क्लासेनने ५१ धावा चोपल्या. त्याला साथ देत नितीश कुमार रेड्डीने अवघ्या १२ चेंडूंचा सामना करत १ चौकार आणि ३ षटकारांच्या साहाय्याने नाबाद २९ धावांची खेळी केली.

## कॉनर कॅरोलचा वर्ल्ड रेकॉर्ड, टी-२० अनोखी कामगिरी करणारा पहिलाच फलंदाज

■ मुंबई/वृत्तसंस्था

सध्या सर्वांच्या नजरा आयपीएल २०२६ वर खिळल्या आहेत. आयपीएलचा यंदाचा हंगाम आता अखेरच्या टप्प्यात पोहोचला आहे, ३ प्लेऑफचे संघ निश्चित झालेले असताना आता अखेरच्या स्थानासाठी ४ संघांमध्ये लढत सुरू आहे. यादरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक नवा विश्वविक्रम घडला आहे. २३ वर्षीय फलंदाज कॉनर कॅरोल याने हा विक्रम रचला.

क्रोएशिया संघाचा सलामीवीर कॉनर कॅरोल याने पुन्हा एकदा तुफानी फलंदाजी करत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. अवघ्या २३ वर्षांच्या डावखुऱ्या फलंदाजाने आपल्या कारकिर्दीतील पहिल्या तीन टी-२० आंतरराष्ट्रीय डावांमध्ये तब्बल २९५ धावा करत नवा इतिहास घडवला. याआधी हा विक्रम फ्रान्सच्या गुस्ताव







मॅककिऑनच्या नावावर होता. त्याने पहिल्या तीन डावांत २८६ धावा केल्या होत्या. मात्र, कॅरोलने तिसऱ्या सामन्यात ७४ धावांची खेळी करत हा विक्रम मोडीत काढला.

टी-२० विश्वचषक युरोप पात्रता स्पर्धेत फ्रान्सविरुद्धच्या सामन्यात कॅरोलने क्रोएशियासाठी पदार्पण केलं. २०९ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना संपूर्ण संघ अपयशी ठरला, पण कॅरोलने एकहाती झुंज दिली. त्याने अवघ्या ३४ चेंडूत ७१ धावांची स्फोटक खेळी केली. विशेष म्हणजे, या सामन्यात त्याच्यानंतर संघातील खेळाडूची सर्वोच्च धावसंख्या १२ धावा होती. त्यामुळे कॅरोलची ही खेळी संघासाठी महत्त्वाची ठरली.

त्यानंतर स्वित्झर्लंडविरुद्धच्या सामन्यातही कॉनर कॅरोलने आपला वादळी फॉर्म कायम ठेवला. त्याने अवघ्या ७२ चेंडूत तब्बल १५० धावांची धडाकेबाज खेळी केली. या खेळीत त्याने १० षटकार आणि १३ चौकार लगावले. क्रोएशियाच्या उर्वरित चार फलंदाजांनी मिळून फक्त ४१ धावा केल्या, यासह संघाची धावसंख्या २ बाद ११९ धावा अशी होती.

फलंदाजीतील या मास्टरक्लासनंतर कॅरोलने गोलंदाजीतही चमक दाखवत आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिली विकेट घेतली. अखेरीस स्वित्झर्लंडचा संघ लक्ष्यापासून १६ धावा दूर राहिला. तिसऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्यात जर्सीसारख्या मजबूत संघाविरुद्ध क्रोएशियाच्या गोलंदाजांची मोठी कसोटी लागली. जर्सीने ३ बाद २८० धावांचा प्रचंड डोंगर उभारला. कॅरोललाही गोलंदाजीत संघर्ष करावा लागला आणि त्याने चार षटकांत ६३ धावा दिल्या. मात्र, धावांचा पाठलाग करताना त्याने पुन्हा एकदा जबरदस्त खेळी साकारली. त्याने अवघ्या ३१ चेंडूत ७४ धावा करत सलग तिसऱ्या सामन्यात संघाचा सर्वोच्च धावसंख्या करणारा फलंदाज ठरला. या खेळीत त्याने ९ षटकार आणि ३ चौकार लगावले. मात्र, इतर फलंदाजांकडून साथ न मिळाल्याने क्रोएशियाचा डाव अखेरीस १७१ धावांवर आटोपला. या अफलातून तीन सामन्यांनंतर कॅरोलची आंतरराष्ट्रीय आकडेवारी थक्क करणारी आहे. त्याच्या नावावर १४७.५० च्या सरासरीने आणि २१५.३२ च्या जबरदस्त स्ट्राइक रेटने २९५ धावा आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करण्यामागे देशांतर्गत क्रिकेटची भक्कम पार्श्वभूमी आहे. गेली दोन वर्षे तो ऑस्ट्रेलियातील ग्रेड क्रिकेटमध्ये सातत्याने खेळत आहे. इतकंच नाही, तर फेब्रुवारी २०२६ मध्ये त्याने दक्षिण ऑस्ट्रेलिया सेकंड इलेव्हनकडूनही सामना खेळला होता.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोहनलाल यांना झटका, 'दृश्यम 3'च्या कमाईत दुसऱ्या दिवशी मोठी घट, इतकाच कमवला गल्ला

सस्पेन्सचा जबरदस्त तडका असलेला 'दृश्यम ३' हा मल्याळम भाषेतील सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला. पहिल्या दिवशी जोरदार ओपनिंग केल्यानंतर दुसऱ्या दिवशीही या सिनेमानं मोठा गल्ला जमवला आहे.मल्याळम चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार मोहनलाल याचा बहुप्रतीक्षित सस्पेन्स थ्रिलर चित्रपट 'दृश्यम ३' केव्हा प्रदर्शित होणार, याबद्दल चाहत्यांना उत्सुकता होती. दोन दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला हा सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. २१ मे रोजी मोहनलाल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रदर्शित झालेल्या या चित्रपटानं पहिल्याच ४० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता या चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाचे (शुक्रवार) बॉक्स ऑफिस कलेक्शनचे आकडे समोर आले आहेत.सॅकनिल्क' च्या रिपोर्टनुसार, दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत थोडी घट झाली असली, तरी जागतिक स्तरावर या चित्रपटानं अवघ्या दोन दिवसांतच तब्बल ७५ कोटींचा टप्पा पार केला दृश्यम ३' नं गुरुवारी पहिल्या दिवशी भारतात १५.८५ कोटींची नेट कमाई केली होती. दुसऱ्या दिवशी, म्हणजेच शुक्रवारी



(वर्किंग डे असल्यामुळं) चित्रपटाच्या कमाईत जवळपास ३०% ची घट पाहायला मिळाली. दुसऱ्या दिवशीची ही कमाई १०.८५ कोटी इतकीच होती. तर भारतातील दोन दिवसांची कमाई ही २६.७० कोटींवर पोहोचली आहे. तर परदेशातही सिनेमाला मोठा प्रतिसाद मिळत असल्यानं बॉक्स ऑफिसवरचे आकडे लक्ष वेधणारे आहेत. सिनेमानं परदेशात दोन दिवसांत ४५ कोटींच्या जवळपास कमाई केली आहे. त्यामुळं वर्ल्डवाईड बॉक्स ऑफिस कलेक्शनबद्द बोलायचं झालं तर हा आकडा ७५ ते ७६ कोटींच्या घरात जात आहे.अवघ्या दोन दिवसांत ७६ कोटींच्या जवळ पोहोचलेला हा चित्रपट आता वीकेंडला (शनिवार आणि रविवार) १०० कोटींचा टप्पा सहज पार करेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.जीतू जोसेफ यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'दृश्यम ३' हा यंदाच्या वर्षातील दुसरा सर्वात मोठा मल्याळम ओपनर ठरला आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर मोहनलाल आणि मल्याळम सुपरस्टार मम्मुटी यांचा काही दिवसांपूर्वी आलेला 'पेट्रियट' हा चित्रपट आहे.

चित्रपटाबद्दल बोलायचं झाल तर, 'दृश्यम ३' ची कथा 'दृश्यम २' जिथं संपली होती, तिथूनच पुढं जाते. चित्रपटात मोहनलाल पुन्हा एकदा आपल्या 'जॉर्जकुट्टी' या आयकॉनिक भूमिकेत दिसत असून, यावेळी तो एक फिल्म प्रोड्युसर बनला आहे. चित्रपटात त्याच्यासोबत मीना, आresidual सिनेमाज, अन्सबा हसन आणि एस्थर अनिल यांच्या मुख्य भूमिका आहेत. समीक्षक आणि प्रेक्षकांकडून चित्रपटाला संमिश्र ते सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

## काय परिधान करावं हा ज्याचा-त्याचा प्रश्न`, प्राजक्ताच्या कान्स लुकवर स्पष्टच बोलली सई

कान्स चित्रपट महोत्सवाविषयी का सध्या खूप बोललं जातंय. तिथल्या रेड कार्पेटवर अवतरलेले हॉलिवूडचे सेलिब्रिटी चर्चेत असतातच. पण यावेळी काही मराठी कलाकारांनीही जगाचं लक्ष वेधून घेतलं. विशेषतः अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या रेड कार्पेटवरील पेहरावाची खूप चर्चा झाली. पारंपरिक पेहरावाला आधुनिक टच देत तिनं प्रयोग केला. त्याचं काहींनी कौतुक केलं, तर काहींनी टीका केली. या साऱ्याबाबत अभिनेत्री सई ताम्हणकर हिनं तिचं मत मोकळेपणानं 'मुंटा'कडे व्यक्त केलं आहे. प्राजक्ताचा अभिमान वाटत असल्याचं तिनं यावेळी स्पष्टपणे सांगितलं.


'मला प्राजक्ता माळी हिचा अभिमान वाटतो. तिनं ज्या ग्रेसनं 'कान'च्या रेड कार्पेटवर स्वतःला सादर केलं ते मला खूप आवडलं. पण काही जणांना ते खूप झोंबलं. एका अर्थी मला हे चांगलं वाटतं, कारण याचा अर्थ तिच्याकडे खूप जणांचं लक्ष होतं. खरं तर काय परिधान करावं आणि काय नाही; हा ज्याचा-त्याचा प्रश्न




आहे. काहीही झालं तरी, लोक बोलणारच आहेत. म्हणजे तुम्ही तिथे गेलात तरी आणि नाही गेलात तरी, चर्चा होऊ शकते. पण आपण का इतक्या तक्रारी करायच्या? त्यापेक्षा ते-ते क्षण साजरे करायला हवेत', असं सई म्हणाली. अभिनयासह स्टाइल आणि फॅशनसाठीही सईचं नेहमी कौतुक होतं. नवनवीन प्रयोग करत ती फोटोशूटही करत असते. त्यामुळे ग्लॅमरस सई कान्सच्या रेड कार्पेटवर कधी दिसणार, असं विचारलं असता ती म्हणाली, 'मी कान महोत्सवाला कधी गेले, तर मला माझ्या एखाद्या चित्रपटाच्या सादरीकरणासाठी जायला आवडेल. वैविध्यपूर्ण पेहराव परिधान करत प्रयोगशील फोटोशूट करणं हा माझ्या कामाचा एक भाग आहे. मी माझ्या कामाप्रमाणे फोटोशूटचाही तितकाच आनंद घेते. काहींना ते आवडतं, तर काहींना खर्चिक वाटतं; याबद्दल प्रत्येकाची मतं वेगवेगळी असू शकतात. ख्या आयुष्यातही मला प्रयोग करण्याची भीती वाटत नाही. त्यामुळेच ते माझं काम, स्टायलिंग आणि फोटोशूट यामध्ये उतरत असेल आणि म्हणूनच ते अधिक उठून दिसत असेल.

## मी गुपचूप लग्न करणार नाही', गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरव्या बांगड्या

कंगनाच्या लग्नाची चर्चा सुरू असून यावर अभिनेत्रींनं प्रतिक्रिया दिली आहे.कंगना रणौतचा मंगळसूत्र घातलेला आणि कपाळावर कुंकू लावलेला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यामुळे तिच्या लग्नाबद्दल चर्चा सुरू झाली. यावर आता कंगनानं प्रतिक्रिया देत लिहिलं की, 'मी शहरात दररोज एका चित्रपटाचं शूटिंग करत आहे. कोणीतरी माझा सहज फोटो काढला आणि त्यावेळी मी भूमिकेत आणि मेकअपमध्ये होते. आता मला खूप फोन येत आहेत, पण विवाहित महिलांच्या दिसण्याबद्दल एवढा मोठा मुद्दा काय आहे? कलाकार सर्व प्रकारच्या भूमिका साकारतात. मी गुपचूप लग्न करणार नाही. मी वचन देते.'कंगना रणौत यापूर्वीही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत राहिली आहे. अलीकडेच, तिचं नाव चिराग पासवानसोबत जोडलं गेलं होतं. दोघेही राजकारणी असल्यानं त्यांची वारंवार भेट होते. त्यांच्या वारंवार एकत्र दिसण्यामुळे ते एकमेकांना डेट करत असल्याचा अंदाज लोकांनी लावला होता. पण, कंगनानं नंतर त्यांच्या नात्यावर



प्रतिक्रिया दिली आणि ते फक्त मित्र असल्याचं सांगितलं. राजकारणात येण्यापूर्वी कंगना आणि चिराग इंडस्ट्रीमध्येही एकमेकांना ओळखत होतेकंगना रणौतने दुसऱ्या एका पोस्टमध्ये उष्णतेबद्दल पोस्ट करत लिहिलं की, 'न्यूज अँकर्स त्यांच्या एसी स्टुडिओमधून बाहेरच्या तापमानाबद्दल आणि उष्णतेच्या लाटेबद्दल तक्रार करत आहेत, पण आमच्यासारख्या लोकांचं काय, जे बाहेर प्रचंड उन्हात शूटिंग करत आहेत? तक्रार करणं थांबवा मित्रांनो.'दरम्यान, कंगनाच्या कामाबद्दल सांगायचं तर ती शेवटची 'इमर्जन्सी' या चित्रपटात दिसली होती. हा सिनेमा माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर आधारित होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाला, परंतु ओटीटी प्लॅटफॉर्मवर सिनेमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

## आई तशी लेक! `कान्स`च्या इव्हेंटमध्ये ऐश्वर्या रायसह आराध्या बच्चनच्या ग्लॅमरस लुकचीही जोरदार चर्चा

जागतिक पातळीवर प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कान्स चित्रपट महोत्सव २०२६ मध्ये अनेक भारतीय कलाकारांनी हजेरी लावली.पण सगळ्यांना उत्सुकता होती ती अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन हिच्या लुकची.बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन दरवर्षी आपल्या फॅशन आणि सौंदर्यानं कान्सच्या रेड कार्पेटवर सर्वांना भुरळ पाडते. यावर्षी ती येणार की नाही, याबद्दल चर्चा सुरू होत्या, अखेर ऐश्वर्या एअरपोर्टूर स्पॉट झाली अन्, चाहत्यांच्या प्रश्नांचं उत्तर मिळालं.यंदाच्या कान्स महोत्सवात ऐश्वर्याचा पहिला लुक समोर आलाय. पण तिच्या पेक्षाही जास्त चर्चा रंगली आहे ती तिची लाडकी लेक





आराध्या बच्चन हिची!१४ वर्षांच्या आराध्यानं पहिल्यांदाच अधिकृतपणे आपल्या आईसोबत म्हणजे ऐश्वर्यासोबत एका ब्रॅन्डच्या इव्हेंटमध्ये सहभाग घेतला. या इव्हेंटमध्ये आराध्याच्या ग्लॅमरस लूकनं इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे.काही दिवसांच्या चर्चांनंतर ऐश्वर्या आणि आराध्या नुकतेच फ्रान्सला पोहोचले होते. त्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी 'लाइट्स ऑन वुमेन्स वर्थ' (Lights On Women's Worth) या कान्सच्या विशेष कार्यक्रमात या माय-लेकीनं एकत्र एन्ट्री घेतलीनेहमी आपल्या आईसोबत साध्या लूकमध्ये दिसणारी आराध्या यावेळी एका अत्यंत स्टायलिश आणि ग्लॅमरस अवतारात कॅमेऱ्यासमोर आली.

आराध्यानं या खास संध्याकाळी सॅटिन फॅब्रिकचा गडद लाल रंगाचा सुंदर गाऊन परिधान केला होतातर आराध्याच्या हेअर स्टाईलवरूनही तिला अनेकदा बोललं गेलं आहे. पण यावेळी तिच्या हेअर स्टाईल बदल पाहायला मिळाला.आराध्यानं तिची नेहमीची सिग्नेचर बँग्ज हेअरस्टाईल बदलून साइड-पार्टेड स्टाईल केलीय. आराध्यानं लाल गाऊनमध्ये लक्ष वेधलं, तर दुसरीकडे ऐश्वर्या राय बच्चननं 'सोफी कुटूर' या ब्रँडचा फिकट गुलाबी रंगाचा फ्लोरल गाऊन परिधान केला होता. हॉटेलमधून निघताना ऐश्वर्या आराध्याचा हात पकडून गाडीकडं जातानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. आराध्याच्या या लूकचे फोटो आणि व्हिडिओ समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. अनेकांनी तिचं कौतुक करताना तिला "भविष्यातील क्वीन" म्हटलं आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महिलेचा अपमान महागात पडला! मुजोर अधिकाऱ्याला रविकांत तुपकरांचा थेट इशारा

## ऑफिसमध्ये येऊन नंगा करून मारीन....

जनसंचलन/बुलढाणा

महिलांच्या सन्मानाशी खेळ करणाऱ्या एका मुजोर अधिकाऱ्याला शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी चांगलेच धारेवर धरल्याची घटना बुलढाण्यात घडली. एका पीडित महिलेनं आपल्या कामासाठी तुपकरांकडे धाव घेतली होती. तुपकरांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्याला फोन करून महिलेचे काम करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, महिला कार्यालयात गेल्यानंतर त्या अधिकाऱ्याने उडवाउडवीची उत्तरे देत, तुम्ही सारखे यांच्याकडून/त्यांच्याकडून फोन लावताफ्र असे म्हणत तिचा अपमान केल्याचा आरोप आहे. ही बाब तुपकरांच्या कानावर जाताच त्यांनी संतप्त होत अधिकाऱ्याला फोनवरच फैलावर घेतले. तुम्हाला एवढा माज आला आहे का? नागरिकांना त्रास देता? महिलांचा अपमान करता? ऑफिसमध्ये येऊन कपडे काढून नंगा करून मारीन, अशा आक्रमक शब्दांत तुपकरांनी अधिकाऱ्याला सुनावल्याची चर्चा शहरात रंगली आहे. भर उन्हात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना टोलवाटोलवी, उद्धट वागणूक आणि प्रशासनातील वाढती मुजोरी यामुळे




सामान्य जनता त्रस्त झाली आहे. अशा अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी तुपकरांसारख्या आक्रमक नेतृत्वाची गरज असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

# जामोद ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम ठरला यशस्वी

## अभ्यासिकेतून विशाल हातेकरची एसआरएफ मध्ये दमदार निवड!

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील जामोद ग्रामपंचायतीने राबविलेला अभ्यासिका उपक्रम आता खऱ्या अर्थाने यशाची गाथा ठरू लागला आहे. सरपंच पुत्र तथा युवा उद्योजक समाधान दामोदर यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेचा पहिला मोठा निकाल समोर आला असून, येथे नियमित अभ्यास करणाऱ्या विशाल साहेबराव हातेकर याची राज्य राखीव पोलीस दलात () निवड झाली आहे. या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचा जल्लोष पसरला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शांत आणि शिस्तबद्ध अभ्यासाचे वातावरण मिळावे या हेतूने सुरू केलेल्या या उपक्रमाने पहिल्याच टप्प्यात मोठे यश मिळवले आहे. विशाल हातेकरच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांमध्येही नवी ऊर्जा आणि स्पर्धा परीक्षांकडे वळण्याची प्रेरणा निर्माण



झाली आहे. अभ्यासिकेमुळे योग्य दिशा आणि वातावरण मिळाले, त्याचाच हा परिणाम आहे, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, ग्रामीण भागात अशा सुविधा वाढल्या तर अनेक ङ्गविशालफ घडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. समाधान दामोदर यांनीही आनंद व्यक्त करत, हा उपक्रम गावातील युवकांचे भविष्य घडवणारा ठरेल असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

# अन् जिल्हाधिकारी थेट पंपावर धडकले साठे बाजांचे धाबे दणाणले!



जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवा पसरताच जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी शुक्रवारी थेट मैदानात उतरून पेट्रोल पंपांवर अचानक धाड टाकली. शहरासह प्रमुख महामार्गावरील पंपांवर अचानक पोहोचलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी इंधन साठ्याची प्रत्यक्ष पाहणी करत पंप चालकांची चांगलीच झाडाझडती घेतली. ङ्गस्टॉक रजिस्टरफ तपासणीपासून थेट भूमिगत टाक्यांमधील इंधन मोजणीपर्यंत प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतल्याने पंप चालकांमध्ये खळबळ उडाली. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर सुरू असलेल्या टंचाईच्या चर्चेमुळे अनेक पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी ऑईल कंपन्यांचे प्रतिनिधी, पुरवठा विभाग आणि पोलिस प्रशासनासोबत तातडीची बैठक घेत साठेबाजी करणाऱ्यांना सोडणार नाहीफ्र असा कडक इशारा दिला. कृत्रिम टंचाई निर्माण केल्यास परवाना रद्द करण्यासह कठोर कायदेशीर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. विनाकारण गर्दी टाळावी,फ्र असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी केले. पेट्रोल पंपांवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

# कोकिळा आवाजाने जिंकली मनं!

## अनंताभाऊ देशपांडेंच्या स्वरातून नदीच्या पल्याडबाई ला नवा जीव......

जनसंचलन/बुलढाणा

वामनदादा कर्डक यांच्या स्मृतिदिनानिमित्त बुलढाणा अर्बन मिडिया हाऊसतर्फे सादर करण्यात आलेल्या नदीच्या पल्याड बाई या अजरामर गीताने रसिकांच्या मनाला अक्षरशः स्पर्श केला आहे. विशेष म्हणजे हे गीत आपल्या भावपूर्ण आणि कोकिळा स्वरांत सादर करणारे अनंताभाऊ देशपांडे यांचे सर्वत्र कौतुक होत असून बुलढाण्याला त्यांच्या रूपाने लाभलेला हा आवाज जिल्ह्याचा अभिमान ठरत आहे. नदीच्या पल्याड बाई, झाडी लई दाट... या ओळींतून माहेरच्या ओढीने व्याकूळ झालेल्या स्त्रीच्या भावना ज्या हळुवारपणे व्यक्त होतात, त्याच भावना अनंताभाऊंनी आपल्या आवाजातून जिवंत केल्या. गीतातील प्रत्येक शब्द त्यांनी इतक्या आत्मीयतेने गायला की श्रोते थेट आपल्या गावाकडच्या




आठवणींमध्ये हरवून गेले. त्यांच्या स्वरांतून ग्रामीण संस्कृती, मातीचा सुगंध, नात्यांची ऊब आणि माहेरची ओढ जणू सजीव झाली. अनंताभाऊ देशपांडे हे केवळ गायक नाहीत, तर भावनांना स्वरांतून जपणारे एक संवेदनशील कलावंत असल्याची भावना अनेक रसिकांनी व्यक्त केली. बुलढाण्यात असा कोकिळा आवाज लाभणे ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून, येणाऱ्या काळात अनंताभाऊ आपल्या गायकीच्या जोरावर जागतिक पातळीवरही रसिकांची मनं जिंकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उपक्रमासाठी डॉ. सुकेश झंवर, सौ. कोमल झंवर आणि राधेश्यामजी चांडक यांची प्रेरणा लाभली. यावेळी बुलढाणा अर्बन मिडिया हाऊसचे सदस्य, कलाकार आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक माध्यमांवरही या गीताला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# जीभ छाटेन, घरात घुसून मारेन; आता आमदार संजय गायकवाड अडचणीत? न्यायालयाच्या आदेशाने चौकशीचा दणका!

**जनसंचलन बुलढाणा**

शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांना मोठा कायदेशीर झटका बसला असून, प्रकाशक प्रशांत आंबी यांना धमकावल्याप्रकरणी आता पोलिस चौकशीचा मार्ग मोकळा झाला आहे. कोल्हापूर सत्र न्यायालयाने राजारामपुरी पोलिसांना चौकशीस परवानगी दिल्यानंतर राज्यभरात या प्रकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे. शिवाजी कोण होता? या पुस्तकावरून संतापलेल्या संजय गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ करत ङ्ङघरात घुसून मारेन, जीभ छाटेनफ्र अशी धमकी दिल्याचा ऑडिओ व्हायरल झाला होता. या ऑडिओनंतर राज्यात प्रचंड राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण झाला होता. विशेष म्हणजे या संभाषणात दिवंगत विचारवंत गोविंद पानसरे यांच्याबाबतही






आक्षेपार्ह भाषा वापरण्यात आल्याचा आरोप आहे. प्रशांत आंबी यांनी कोल्हापूरच्या राजारामपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र सुरुवातीला पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याची चर्चा होती. आता न्यायालयाच्या आदेशामुळे पोलिसांना अधिकृत चौकशी करता येणार असून, आमदार गायकवाड यांना चौकशीसाठी नोटीस बजावली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रशांत आंबी यांनी धक्कादायक दावा करत सांगितले की, गेल्या महिनाभरात त्यांना १०० पेक्षा अधिक धमकीचे फोन आले आहेत. त्यामुळे त्यांनी नव्याने तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. राजकीय वर्तुळात या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली असून, वादग्रस्त वक्तव्ये आता गायकवाडांच्या अंगलट येणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

---

# इंधन रांगांना थंडावा! संदीपदादा शेळके यांच्या संकल्पनेतून जिल्हाभर दिलासादायक उपक्रम...



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील वाढत्या तापमानाने ४३ अंशांचा टप्पा ओलांडला असताना, पेट्रोल-डिझेलसाठी लांबच लांब रांगेत उभ्या राहणाऱ्या नागरिकांसाठी राजर्षी शाहू मल्टिस्टेटने एक दिलासादायक पाऊल उचलले आहे. काँग्रेस नेते संदीपदादा शेळके आणि संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांच्या संकल्पनेतून जिल्हाभर इंधन रांगेतील नागरिकांसाठी थंड पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना पेट्रोल व डिझेल मिळवण्यासाठी तासनतास उन्हात उभे राहावे लागत आहे. काही ठिकाणी तर रात्रभर रांगेत थांबण्याची वेळ येत असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत तहान भागवणारा हा उपक्रम ङ्गमानवतेचा आधारफ ठरत आहे. धामणगाव बढे, शेंबा, मोताळा, उदयनगर, आंबेटाकळी, नांदुरा, पातूर्डा, संग्रामपूर, जळगाव, खामगाव, शेगाव, वरवट बकाल, मेहकर, देऊळगाव साकरशा, जानेफळ, सुलतानपूर, बिबी, देऊळगाव राजा आणि सिंदखेड राजा अशा अनेक भागांतील पेट्रोल पंपांवर शुक्रवारी थंड पाण्याचे वाटप करण्यात आले. पुढील काळात जिल्ह्यातील सर्व प्रमुख पंपांवर हा उपक्रम सातत्याने राबवला जाणार असल्याची माहिती संस्थेने दिली आहे. उन्हाच्या तडाख्यात शेतकरी वर्गाला शेतीची कामेही थांबवता येत नाहीत, आणि इंधनासाठी रांग सोडणेही शक्य नाही. त्यामुळे पाणी, अन्न आणि विश्रांतीशिवाय ताटकळत उभे राहण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अशा वेळी थंड पाण्याचा घोट मिळाल्यावर चेहऱ्यावर उमटणारा दिलासा अनेकांनी शब्दांत व्यक्त केला.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानफ्रमध्ये बुलढाण्याचा ऐतिहासिक डंका

## सुलज ग्रामपंचायत जिल्ह्यात अव्वल...

**जनसंचलन/ ज.जामोद**



महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा मान उंचावला आहे. जळगाव जामोद तालुक्यातील सुलज ग्रामपंचायतीने या अभियानात सर्वोच्च गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या अभियानात शाश्वत स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शुद्ध पाणीपुरवठा, १००% कर वसुली आणि ई-गव्हर्नन्स अशा निकषांवर ग्रामपंचायतींचे गुणांकन करण्यात आले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. जळगाव जामोद तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. सुलज ग्रामपंचायतीने नियोजनबद्ध कामकाज, स्वच्छता अभियान, डिजिटल शाळा सुशोभीकरण आणि ग्रामपंचायत कार्यालयाच्या आधुनिकीकरणातून विशेष छाप पाडली. गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे आणि विस्तार अधिकारी राजेंद्र कोलते यांच्या सातत्यपूर्ण भेटी व मार्गदर्शनामुळे गाव पातळीवर मोठा बदल घडून आला. सरपंच लता टापरे, ग्रामविकास अधिकारी कविता जवंजाळकर, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, शिक्षक, बचतगट, आशा वर्कर्स आणि ग्रामस्थ यांच्या सामूहिक प्रयत्नातून हे यश साध्य झाले. तपासणी समितीने दिलेल्या अहवालानुसार सुलज ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचे बक्षीस मिळण्यास पात्र ठरले आहे. या यशामुळे सुलज ग्रामपंचायत राज्यस्तरासाठी पात्र ठरली असून जळगाव जामोद तालुक्याच्या विकासाची नवी ओळख निर्माण झाली आहे. ही सामूहिक मेहनत आणि एकजुटीचा विजय आहे,फ्र अशी प्रतिक्रिया गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे यांनी दिली. या ऐतिहासिक यशामुळे बुलढाणा जिल्ह्याने राज्यात आपली वेगळी छाप उमटवली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८